गोंदिया येथील नाटयगृह तिसऱ्या हप्त्याचे अर्थसहाय्य वितरीत करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : नागृबा-२०११/प्र.क्र.४२/सां.का.१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ मार्च, २०१८.

<u>वाचा</u> : १) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक नागृबा-२०१०/प्र.क्र.३२१/सां.का.१, दि.१४.०१.२०११.
२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक नागृबा-२०११/प्र.क्र.४२/सां.का.१, दि.२५.०२.२०११.
३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक नागृबा-२०११/प्र.क्र.४२/सां.का.१, दि.१४.१०.२०११.
४) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक नागृबा-२०११/प्र.क्र.४२/सां.का.१, दि.२५.११.२०१४.

<u>प्रस्तावना</u> :

शासन निर्णय दि.२५.०२.२०११ अन्वये गोंदिया नाटयगृह बांधकामाकरीता पहिल्या हप्त्याचे म्हणून रु.१.८० कोटी इतके अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले. तथापि अर्थसंकल्पीय निधीच्या उपलब्धतेनुसार रु.१.५० कोटी एवढे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले होते. तसेच शासन निर्णय दि.२५.११.२०१४ अन्वये पहिल्या हप्त्याची उर्वरीत रक्कम रु.३०.०० लाख व दुसऱ्या हप्त्याचे रु.२.२५ कोटी असे एकूण रु.२.५५ कोटी एवढे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले होते. महाराष्ट्र विधानमंडळाच्या माहे डिसेंबर, २०१७ मध्ये नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात "नाटयगृह बांधकामास अर्थसहाय्य" या प्रयोजनार्थ पुरवणी मागणीद्वारे मंजूर रकमेपैकी रु.४.०० कोटी इतकी रक्कम गोंदिया येथील नाटयगृहासाठी उपलब्ध झाली आहे. तसेच जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्या कार्यालयाकडून यापूर्वीच्या वितरीत निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाले असल्याने शासन हिश्श्याचा तिसरा हप्ता वितरणाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :

विचारांती या शासन निर्णयान्वये गोंदिया येथे नाटयगृह इमारतीचे बांधकामासाठी शासकीय अर्थसहाय्याच्या तिसऱ्या हप्त्याची रक्कम रु.४,००,००,०००/- (रुपये चार कोटी फक्त) वितरीत करण्यास खालील अटींच्या अधिन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत असलेल्या तिसऱ्या हप्त्याची अर्थसहाय्याची रक्कम रु.४,००,००,०००/- खर्च केल्याचे विहित नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र तसेच कामाचे भौतिक साध्य याबाबतची माहिती सादर करणे बंधनकारक राहील.
२) शासन निर्णय दि.१४ ऑक्टोबर, २०११ अन्वये विहित केलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करणे नगर परिषद, गोंदिया व जिल्हाधिकारी, गोंदिया यांना बंधनकारक राहिल.
३) नाटयगृह बांधकामाचे भौतिक साध्य व सद्यस्थिती जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे मार्फत शासनाला सादर करणे मुख्याधिकारी नगर परिषद, गोंदिया यांना बंधनकारक राहील.
४) जिल्हा मुख्यालयी नाटयगृह बांधकाम योजनेबाबत शासन निर्णय दि.२९.०२.२०१६ मधील विहीत सर्व अटी व शर्तीचे पालन करणे गोंदिया नगरपरिषदेला बंधनकारक राहील.

५) नाटयगृहाचे बांधकाम जास्तीत-जास्त दोन वर्षाच्या कालावधीत पूर्ण करणे अनिवार्य आहे तथापि हा कालावधी उलटुन गेला आहे. यास्तव आता उर्वरित बांधकाम लवकरात लवकर पुर्ण करण्यात यावे, तसेच यासाठी वितरीत निधी नाटयगृहाच्या बांधकामावरच खर्च करण्यात यावा.

६) जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी नाटयगृहाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर संपुर्ण खर्चाचा हिशोब व ताळेबंद सनदी लेखापाल यांच्या प्रमाणपत्रासह या विभागास सादर करावा.

७) शासनाच्या वापरासाठी नाटयगृह हवे असल्यास ते प्राथम्याने आरक्षित करणे आवश्यक राहील.

८) शासनाने वेळोवेळी केलेले नियम व अटी मधील बदल सदर नाटयगृहास बंधनकारक राहतील.

२. यासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती (००) १०२, कला व संस्कृती प्रचालन (०१) (०२) शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे (२२०५ १४८१) ३१-सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखाली सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध झालेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. जिल्हाधिकारी, गोंदिया यासाठी नियंत्रक अधिकारी राहतील व त्यांनी प्राधिकृत केलेल्या दुय्यम अधिकाऱ्यास यासंबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३८/१८/१४४३, दि.०९.०२.२०१८ अन्वये प्राप्त आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ८७/२०१८/व्यय-१५, दि.०९.०३.२०१८ व दि.२७.०३.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०३२७१८१२०१२६२३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prasad Mahadeo Mahajan

Digitally signed by Prasad Mahadeo Mahajan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6fcffe7574d536c6e270856345547bb470a3e70655baa82e214fc4d0cfaccaed, serialNumber=b8ea3f1827aabafa30caec97c98f4c9643851c3a32cfa11a13f635fc0bea0ac3, cn=Prasad Mahadeo Mahajan
Date: 2018.04.21 14:31:28 +05'30'

(प्र.म. महाजन)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. जिल्हाधिकारी, गोंदिया.
२. मुख्य अधिकारी, गोंदिया नगरपरिषद, गोंदिया.
३. जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदिया.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), दोन महाराष्ट्र, नागपूर.
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), दोन महाराष्ट्र, नागपूर.
६. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. कक्ष अधिकारी / अवर सचिव (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई - यांना उपरोक्त शासन निर्णयामधील अर्थसंकल्पिय वितरण प्रणाली (BDS) वर तात्काळ वितरीत करण्यात यावी.
९. निवड नस्ती सां.का.१.